**निशाणी क्रमांक – १०**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०२</u>**

माझे नाव – संजर सदाशिव नाकसाखरे,

वय – ५५ वर्षे धंदा – शेती,

रा.धानोरा खु, ता. अहमदपूर, जि.लातूर.

**<u>शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एन. ए. भांगे.</u>**

**(फौजदारी प्रकिये संहितेच्या कलम २९९ अन्वये)**

**०१.** मी आरोपींना ओळखतो. आरोपी न्यायालयात हजर नाहीत. मी फिर्यादीस ओळखतो. घटना सन २००८ मधील आहे. फिर्यादी भरतीसाठी औरंगाबाद येथे गेले होते. तिथे काम न झाल्याने ते गावी परत आले. गावी आल्यानंतर ४ दिवसांनी आरोपी क्र.१ व २ दोघेही धानोरा येथे आले. त्यांनी फिर्यादीला त्यांचे काम करू असे सांगितले. त्या मोबदल्यात एक लाख रुपयांची फिर्यादीकडे मागणी केली. फिर्यादीने त्याच्या वडीलांच्या खात्यावरून आरोपी क्र.१ व २ यांच्या खात्यावर प्रत्येकी ५० हजार टाकले. त्यानंतर फिर्यादीने ४ महिने वाट पाहिली. आरोपींनी काम झाले नाही असे सांगितले. फिर्यादीने आरोपींकडे त्याच्या पैशांची मागणी केली. आरोपींनी फिर्यादीला पैसे लवकर मिळणार नाहीत असे सांगितले. आरोपींनी फिर्यादीला पैसे दिले नाहीत. फिर्यादीस नौकरीही लागली नाही. पोलीसांनी घटनेच्या अनुषंगाने माझ्याकडे विचारपूस केली होती.

श्रृवणोत्तर स्वीकृत, माझे समक्ष,

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2025.10.31 15:41:37 +0530

दिनांक –३१.१०.२०२५

**(स्वानंदी दे. वडगांवकर)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहमदपूर.